# कोल्हापूर जिल्हा पोलीस शिपाई भरती -२०२२-२३

---

## पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना

- कोल्हापूर जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०२२-२३ मधील उमेदवारांना मैदानी चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश), नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा यामधील नियम ४ (२) नुसार शारिरीक चाचणीत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवारांची संबधीत प्रवर्गातील जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त पदांच्या **०१ : १०** या प्रमाणात लेखी परीक्षेसाठी निवड करण्यात आलेली आहे.
- कोल्हापूर जिल्हा पोलीस शिपाई भरती -२०२२-२३ मधील **पोलीस शिपाई पदाची** लेखी परीक्षा दि. १३.०७.२०२४ रोजी सायंकाळी १६.०० ते १७.३० या वेळेत स्वामी विवेकानंद महाविदयालय,कोल्हापूर या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे
- पोलीस शिपाई पदाचे लेखी परीक्षेची बैठक व्यवस्था खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | परीक्षा केंन्द्र | उमेदवारांचे चेस्ट क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | **स्वामी विवेकानंद महाविदयालय, कोल्हापूर मुख्य इमारत** | **पहिला मजला<br>(खोली क्रमांक १२,१८,२०,२५)<br>चेस्ट क्र.०२ ते ४४१** |
| | | **दुसरा मजला<br>(खोली क्रमांक ३२,३३,४१,४२)<br>चेस्ट क्र.४४७ ते ८७२** |
| | | **तिसरा मजला<br>(खोली क्रमांक ५६,५८,५९,६१,६२,६३,६४)<br>चेस्ट क्र.८७३ ते १६३३** |
| ०२. | **स्वामी विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर** | **तळ मजला<br>(खोली क्रमांक ३,४,६,७)<br>चेस्ट क्र. १६४१ ते २००८** |
| | | **पहिला मजला<br>(खोली क्रमांक १२,१३,१५,१६)<br>चेस्ट क्र.२००९ ते २४८१** |
| | | **दुसरा मजला<br>(खोली क्रमांक १७,२०,२१,२३,२४)<br>चेस्ट क्र.२४८२ ते ३१३३** |
| | | **तिसरा मजला<br>(खोली क्रमांक २५,२८,२९,३१,३२)<br>चेस्ट क्र.३२०१ ते ३८९७** |

- लेखी परीक्षेसाठी महाआयटी कडुन प्रवेशपत्र निर्गमित करण्यात आलेले असुन त http:policerecruitment२०२२.mahait.org या वेबसाईडवरुन उमेदवारांनी आपला युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन स्पष्ट दिसेल अशी प्रिंट काढावी.

- उमेदवारांनी लेखी परिक्षेकरिता दि.१३.०७.२०२४ रोजी दुपारी १४.०० वा. त्यांना प्रवेश पत्रात नमुद केलेल्या परिक्षा केंद्रावर शारिरीक चाचणीवेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र/ओळखपत्र, लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र घेवून वेळेत उपस्थित रहावे तरच परीक्षा केंन्द्रात प्रवेश दिला जाईल, अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

- उमेदवारांने स्वत:ची ओळख पटविण्यासाठी शासनाने जारी केलेले आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड, पासपोर्ट, महाविदयालयीन ओळखपत्र, वाहन परवाना, यापैकी कोणतेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र व ऑनलाईन प्रवेशपत्राची प्रत (हॉल तिकीट) व ०२ फोटो सोबत आणावे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

- उमेदवारांना सदर लेखी परीक्षेसाठी या कार्यालयाकडून काळे पेन पुरविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी सोबत येताना इतर अनावश्यक वस्तु आणु नये. आणल्यास सदरच्या वस्तु महाविदयालयाच्या मेन गेटच्या बाहेर ठेवण्यात येतील त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहिल.

- उमेदवारास परीक्षा वर्गावर मोबाईल, घडयाळ, ब्ल्यु टुथ, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, कॅल्क्युलेटर, नोट पॅड, नोटस बुक, तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे, प्रतिबंधक वस्तु स्वत: जवळ बाळगणैस पुर्णत: मनाई आहे. अशा वस्तु आढळल्यास उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद टरवून त्याची उमेदवारी रदद करण्या बरोबर गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

- एखादा उमेदवार लेखी परीक्षेस गैरहजर राहिल्यास तर त्याला पुन्हा लेखी परीक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरीक्त संधी देण्यात येणार नाही. त्याला संपुर्ण भरती प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

- उमेदवारांने भरती प्रक्रियेमध्ये उध्दट गैर वर्तन/ अनुचित प्रकार केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्याचा, कॉपी करण्याचा अथवा डमी उमेदवार बसविण्याचा प्रयत्न केल्यास त्यास त्याच क्षणी भरती प्रक्रियेतून बाद करुन कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

- उमेदवार अगर त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट/ दलाल, अधिकारी/ कर्मचारी यांच्या भुलथापांना / अमिषाला बळी पडु नये. उमेदवारांची निवड ही सर्व निकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

(महेंद्र क.पंडित,भा.पो.से)
पोलीस अधीक्षक,कोल्हापूर